




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784








वर्ष ३ रे अंक : १३९ वा सोमवार दि. ०७ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# बोगस दिव्यांग शिक्षकांवर जळगाव जिल्ह्यात कारवाई, बुलढाणा कारवाईत शून्य...

## बोगस दिव्यांना वाचवण्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांना रस कशासाठी?

**जनसंचलन/बुलढाणा**

धडधाकट असतानाही बोगस दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करून दिव्यांगांचे लाभ उपटणाऱ्या बोगस शिक्षकांवर जळगाव जिल्ह्यात लवकरच कारवाई सुरू होत आहे. मात्र, बुलढाणा जिल्ह्यात शेकडो बोगस दिव्यांग शिक्षकांचे प्रकरण दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या वतीने उघडकीस आणून देखील जिल्ह्याची प्रशासकीय यंत्रणा अत्यंत ढिम्म झाली आहे. बोगस दिव्यांगांवर कारवाई होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषदेत लॉबिंग होत असल्याची खात्रिलायक माहिती दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजकडे प्राप्त झाली आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांचे या प्रकरणी आळीमिळी गुपचिळी असल्याचे स्पष्ट होत आहे. सरकारी सेवेत असलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी शासनाच्या वतीने काही सवलती दिल्या जातात. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने राज्यभरात धडधाकड शिक्षक व कर्मचाऱ्यांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त केली आहेत. जिल्हा सामान्य रुग्णालयात असलेल्या दिव्यांग बोर्डाकडून हे प्रमाणपत्र घ्यावे लागते. सध्याच्या घडीला जिल्हा सामान्य रुग्णालयातील सबंधीत अधिकारी व कर्मचारी हे दिव्यांग / अस्तिव्यंग विभाग हे भ्रष्टाचाराचे सर्वात प्रमुख केंद्र आज बनले आहे. या ठिकाणी पैसे सरकवले की, कुणालाही दिव्यांग /अस्तिव्यंगाचे प्रमाणपत्र मिळते. यामध्ये जिल्हा रुग्णालयातील अधिकारी काही खासगी एजंट यांचे एक घाणेरडे सर्कल काम करीत आहे. या माध्यमातून कोट्यवधींचा भ्रष्टाचार आजवर झालेला आहे. कारण कुणीही पैसे दिले की, त्याला दिव्यांगाचे प्रमाणपत्र प्राप्त होते. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजला प्राप्त झालेल्या खात्रिलायक माहितीनुसार बुलढाणा जिल्ह्यात बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेतलेल्या शिक्षकांची संख्या यादी प्रमाणे तब्बल ५५५ एव्हढी आहे. काही महिन्यांपूर्वी जिल्हा परिषदेच्या तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी या प्रकरणी दबाव वाढल्यानंतर जिल्ह्यात दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्या सर्वांना मुंबईला जाऊन सेंट जॉर्ज हॉस्पिटलमधून तपासणी करून घेण्याचे फक्त कागदोपत्री आदेश दिले होते. हे आदेश निघाल्यानंतर जिल्हा परिषदेत खळबळ उडाली होती. बोगस दिव्यांग अस्तिव्यंग प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या नालायक शिक्षक व कर्मचाऱ्यांनी त्यासाठी मोठी लॉबिंग केली व अधिकाऱ्यांसोबत अर्थपूर्ण साटेलोटे करून आपल्यावरील कारवाई रोखून धरली होती. वास्तविकतः अशाप्रकारची पडताळणी ही व्हायलाच पाहिजे होती. बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त करण्याचे घाणेरडे प्रकार संपूर्ण राज्यभरात घडलेले आहेत. काही दिवसांपूर्वी मुंबई महानगरपालिकेत २ कर्मचाऱ्यांना निलंबित देखील करण्यात आलेले आहे. आत्ता मिळालेल्या माहितीनुसार जळगाव जिल्ह्यात मागील वर्षी बोगस दिव्यांग शोध अभियान राबवण्यात आले. या अभियानात मोठ्या संख्येने बोगस दिव्यांग आढळून आले आहेत. अशा नालायक शिक्षकांवर कठोर कारवाई करण्यासाठी जळगाव जिल्हा परिषदेत पावले उचलली जात आहेत.याच धरतीवर खरे तर बुलढाण्यातही कारवाई होणे अपेक्षित आहे. परंतु बुलढाण्यातील वरिष्ठ अधिकारी अत्यंत ढिसाळ असल्याचे या निमित्ताने स्पष्टपणे दिसून येत आहे. कारण गेल्या अनेक दिवसांपासून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या प्रकरणी कंठशोष करीत आहे. एव्हढेच नाही तर बोगस दिव्यांगांची माहिती दैनिक जनसंचलन ने जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनाही दिलेली आहे. परंतु अद्यापही म्हणावी तशी कारवाई जिल्ह्यात करण्यात आलेली नाही. यावरून जिल्हा परिषदेचे प्रशासन किती ढिसाळपणे काम करीत आहे, हे स्पष्ट होत आहे. सर्व दिव्यांग शिक्षक कर्मचाऱ्यांची पडताळणी होऊन




त्यातील बोगस दिव्यांगांवर कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या प्रकरणी सातत्याने आवाज उठवण्याचे काम करणार आहे. बोगस दिव्यांग शिक्षक व कर्मचाऱ्यांमुळे खऱ्या दिव्यांगांवर मोठा अन्याय होत आहे. जोपर्यंत बोगस दिव्यांगांवर कारवाई होत नाही, दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या प्रकरणी आवाज बुलंद करीत राहणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना आमचे आवाहन आहे की, तात्काळ यासंदर्भात कारवाई करावी, अन्यथा या अधिकाऱ्यांच्या विरोधातही मोहीम उघडल्याशिवाय दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज राहणार नाही, हे त्यांनी ध्यानात ठेवावे.

# चिखलीतील रोड रॉबरी प्रकरणात पोलिसांचा धमाकेदार खुलासा!

**जनसंचलन/ चिखली**

चिखलीत भरदिवसा प्रवाशाला धमकावून खिशातील मोबाईल आणि रोख रक्कम हिसकावणाऱ्या दोन अज्ञात चोरट्यांचा तीन तासांत शोध लावून पोलिसांच्या डी.बी. पथकाने चांगलीच चुणूक दाखवली. दि. ४ जुलै रोजी राऊतवाडी येथील स्मॉल फायनान्स बँकेतून पत घेतलेले पैसे आणि दोन मोबाईल घेऊन फिर्यादी बसस्टँडकडे जात असताना शिवाजी शाळेजवळ ॲटोमधून आलेल्या दोघांनी त्याला गाठून गळा दाबत जीवे मारण्याची धमकी दिली आणि खिशातील ३००० रोख व १८,५०० किमतीचे दोन मोबाईल हिसकावले. या धक्क्याने फिर्यादीची पत्नी तब्येत बिघडल्यामुळे तक्रार दुसऱ्या दिवशी दाखल करण्यात आली. गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेऊन पो.नि. संग्राम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने तपासाची चक्रे फिरवत अवघ्या काही तासांत बुलडाण्यातून आरोपी शेख नुमान व फैजान खान यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेला ८०,००० किंमतीचा ॲटो, दोन्ही मोबाईल आणि १७६० रोख रक्कम असा एकूण १,००,२६० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उपनि. समाधान वडणे आणि डी.बी. पथकाने केली. आरोपींना अटक करून न्यायालयाने थेट जेल वाट दाखवली आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वाट पांडुरंग पाहतसे।

## संपादकीय लेख

भक्ती, प्रेमाचा सहज, उत्कट आणि मुक्त अविष्कार म्हणजे आषाढी-कार्तिकीची वारी! आचार्य अत्रे यांनी आषाढी आणि कार्तिकी एकादशीचे महत्त्व सांगितले आहे, ङ्गमहाराष्ट्राचा देव विठोबा आणि आषाढी-कार्तिकीची वारी हाच महाराष्ट्राचा धर्म! मराठी जनतेच्या जीवनात दोनच सण आहेत; पण हे सण भोजनाचे नव्हेत, तर भजनाचे आहेत. या दोन सणांचा अपूर्व सोहळा पंढरीस पहायला मिळतो.फ आषाढी एकादशी हा मराठी मातीशी, मराठी माणसाच्या निरपेक्ष जीवनदृष्टीशी आणि महाराष्ट्राच्या अस्मितेशी जोडलेला सार्वजनिक उत्सव आहे. संपूर्ण महाराष्ट्राला आणि अवघ्या मराठी माणसाच्या सर्वसमावेशक समूहभावनेचा आनंदोत्सव म्हणजे आषाढी एकादशी! हे तुकोबांचे उद्गारच आषाढी एकादशीचे जगावेगळे स्वरूप स्पष्ट करतात. आपल्या परमदैवताकडे ङ्गप्रेमम मागण्यासाठी लाखो वारकरी स्त्री-पुरुष पंढरीला पायी जातात. आपल्या परमदैवतावर भरभरून आणि निरपेक्ष वृत्तीने प्रेम करणे, या प्रेमाला व्यापक विश्वात्मक कल्याणकारी रूप देणे, हे वारकरी संप्रदायाच्या भक्तियोगाचे खास वैशिष्ट्य आहे. आळंदी ते पंढरपूर अशी वाटचाल करणारा संतांचा पालखी सोहळा हा संघटित समूहभक्तीचा आनंदोत्सव आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ६०-७० संतांच्या पालख्या वाटेतील गावांना भेटी देत, १८ ते २२ दिवस पायी प्रवास करीत पंढरपूरला आषाढीच्या महायात्रेला जातात. वारीत सहभागी झालेले लाखो वारकरी आणि वारीच्या वाटचालीत नित्यनेमाने, निरपेक्ष बुद्धीने सेवा करणारी गावोगावची सेवेकरी कुटुंबे, असा संपूर्ण महाराष्ट्राचा लोकोत्सव म्हणजे वारी आणि या वारीची सांगता होते, ती आषाढी एकादशी यांच्याशी मराठी जनमानस एकरूप झाले आहे. पहाटेच्या प्रहरी जात्यावर दळण दळणाऱ्या कष्टकरी स्त्रियांनी आषाढी एकादशीला होणाऱ्या पंढरीच्या सोहळ्यावर हजारो ओव्या रचल्या आहेत. या स्त्रियांनी रेखाटलेले आषाढी एकादशीचे मानसचित्र विलोभनीय आहे. भक्तीगंगेचे लोकगंगेत होणारे समर्पण म्हणजे आषाढी एकादशीचा सोहळा. एकादशीचा उपवास, द्वादशीची खिरापत आणि पौर्णिमेचा गोपाळकाला यांना वारीमध्ये सामाजिक व सांस्कृतिक संदर्भात महत्त्व आहे. पंढरपूरजवळील गोपाळपूर येथे पौर्णिमेला काला नावाचा कार्यक्रम होतो. या काल्याचा प्रसाद घेऊन वारकरी वारी पूर्ण झाल्याच्या आनंदात धन्य होऊन गावी परत जातो. ज्वारीच्या लाह्या, दही, साखर, मीठ, मिरच्या यांच्या मिश्रणातून हा प्रसाद तयार केला जातो. हरिकीर्तनानंतर सर्व जण एकमेकांच्या तोंडी काला भरवितात. सारे भेदभाव बाजूला सारून सर्व विठ्ठलभक्त समान आहेत, असा सामाजिक समतेचा विचार या कृतीतून व्यक्त होतो. अन्नग्रहण करण्यातून जातिभेदाची चौकट ओलांडण्याचा संदेश देणारी आषाढी एकादशी, हे महाराष्ट्राच्या लोकस्वभावाचे दर्शन आहे. वारकरी संत परंपरेच्या वाणीने, भाषिक कृतीने म्हणजेच अभंग रूपातील संवादाने मराठी माणसाचे, महाराष्ट्राचे लोकमानस घडविले आहे. मराठी माणसाच्या श्रद्धा, निष्ठा, स्वातंत्र्य आणि समतेच्या संघर्षाचे सांस्कृतिक चिन्ह म्हणून आषाढी वारीकडे पाहता येते. पंढपुरात होणाऱ्या या भक्तीच्या लोकोत्सवात सहभागी होण्यासाठी संत नामदेवांची पुतणी संत संत नागरी हिला तिच्या सासूने, पतीने विरोध केला. तिला घरात खांबास बांधून डांबून ठेवले, तेव्हा देहभान विसरून विठूचे नामस्मरण करणाऱ्या भक्त नागरीच्या - ङ्गसावळे रूपडे देखे तत्कमळी । निजभावे वोवाळी प्राणनाथा ।।फ अशा आर्त भक्तीचा साक्षात पांडुरंगाने आदरपूर्वक स्वीकार केला. ङ्गऐसी विळापतां मनी माध्यान लोटली । घृमी जे दाटली निद्रा नयनी ।। सवेच जागृती सांभाळी परतोनी । तंव उभी कीर्तनी महाद्वारी ।।फ पंढरपुरात आषाढीच्या कीर्तन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी स्त्री संतांना विरोध करणारे कुटुंबीय, कर्मठ समाजधुरीण आणि भेदभाव जपणारी वर्णव्यवस्था यांच्याशी संघर्ष करावा लागला, म्हणून आषाढी एकादशी या लोकोत्सवाकडे सामाजिक समतेच्या प्रस्थापनेचे सांस्कृतिक प्रतीक म्हणून



पाहता येते. स्त्रियांचा सार्वजनिक जीवनात निर्भय, मुक्त संचार करण्यासाठी अवकाश देणारा आचारधर्म म्हणून आषाढीचे महत्त्व अबाधित आहे. सलग १८ ते २० दिवस संसाराचे व्यापताप, मायापाश विसरून नामस्मरणात रमण्याचे, पुरुषांच्या बरोबरीने जनसमूहाचा एक भाग होऊन जाण्याचे स्वातंत्र्य देणारी वारी, हा स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील प्रवेश आहे आणि त्याचे स्वागत खुद्द ईश्वराने, म्हणजे पांडुरंगानेच केले आहे. वर्णव्यवस्थेतील तळाच्या स्तरातील दासी जनीच्या प्रामणिक भक्तीला विठूने दिलेला प्रतिसाद एका अभंगात व्यक्त झाला आहे. स्त्रियांच्या मनातील नैतिक भक्तीचे, भक्त असण्याचे प्रेम व आदरयुक्त सन्मान करणाऱ्या ईश्वराचे चित्रण स्त्री संतांनी केले. स्त्री-पुरुष समतेचा आणि नैतिक आचरणाचा कैवारी ईश्वराचे, म्हणजेच अंतिम सत्तेचे मूर्त रूप रेखाटण्याची संधी स्त्रियांना आषाढी एकादशीच्या माध्यमातून प्राप्त झाली. आषाढी एकादशीला पंढरपुरात होणारी कीर्तनभक्ती स्त्रियांना ङ्गस्त्रीजन्म म्हणुनीफ या बंधनातून मुक्त करते.

# बळीराजासाठी चांगला पाऊस पडु दें..!

## विठुराया चरणी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी घातलं साकडे!

**जनसंचलन/बुलडाणा**

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ।। विठुरायाच्या चरणी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव सपत्नीक नतमस्तक होऊन सर्वांना चांगल आयुष्य,आरोग्य लाभो आणि बळीराजासाठी चांगला पाऊस पडू दे... असे साकडे विठू चरणी घातले. आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी लाखो भाविक व वारकरी दिंडया श्री.क्षेत्र पंढरपूर येथे जाऊ विठूराया चरणी नतमस्तक होतात. डोळ्याचं पारणं फेडणाऱ्या भक्तीमय सोहळ्यासाठी राज्यातील काना कोपऱ्यातुन लाखो वारकरी विठ्ठल नगरीत विठ्ठला चरणी नतमस्तक होण्यासाठी एकवटतात. आषाढी एकादशी निमित्त केंद्रीय आयुष स्वतंत्र प्रभार तथा आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी श्री. पांडुरंगाचे मनोभावे दर्शन घेतले. देशातील प्रत्येक नागरिकांना चांगले निरोगी आयुष्य मिळूदे... अन्नधान्य पुरवणाऱ्या बळीराजासाठी दमदार पाऊस होऊ दे ...असे साकडेही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी विठुराया चरणी घातले. यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषि प्रतापराव जाधव उपस्थित होते. देशाचे केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव हे विठुरायाचे परमभक्त आहेत. कोरोनाचा दोन वर्षाचा कार्यकाळ सोडला तर गेल्या



४३ वर्षापासून ते आषाढी एकादशीला नियमितपणे विठू चरणी नतमस्तक होण्यासाठी जात असतात..प्रत्येक भारतीयांना निरोगी आयुष्य लाभु दे ... बळीराजाला सुखी ठेव... चांगला पाऊस पडू दे .. असं साकड त्यांनी आपली ४३ वी वारी पूर्ण करताना विठ्ठल चरणी घातलं.

# सचिन खंडारे राज्यस्तरीय बहुजन रत्न पुरस्काराने सन्मानित ।



**जनसंचलन/बुलढाणा**

ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली द्वारा संचलित, तुकाराम आश्रय वृद्धाश्रम , सुलोचना माहेरघर महिला आश्रम लताबाई बाल अनाथ आश्रम भोकर तालुका चिखली यांच्या वतीने दि ६ जुलै श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये पुन्हा एकदा राज्यस्तरीय बहुजन रत्न पुरस्काराने पत्रकार सचिन खंडारे यांना सन्मानित करण्यात आले बहुजन चळवळीमध्ये सचिन खंडारे सातत्याने अविरतपणे काम करत आहेत समाजामध्ये जाऊन जनजागृती सामाजिक कार्यक्रम आयोजित करणे रक्षाबंधनाला महिलांना साडीवाटप रक्तदान शिबिराचे आयोजन . तसेच लेखणीच्या माध्यमातून बहुजन समाजाच्या व्यथा व कथा मांडण्याचे काम सचिन खंडारे सातत्याने करत आले आहेत याच कार्याची पावती म्हणून त्यांना बहुजन रत्न राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे . ,यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून व्याख्याते कुणाल भाऊ पैठणकर आंबेडकर चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते कैलास भाई सुखदाने कार्यक्रमाचे संयोजक प्रशांत भाऊ डोंगरदिवे अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रताप दादा मोरे दैनिक लॉर्ड बुद्धाचे प्रतिनिधी मोरे ॲड शिरसाट साहेब , दांडगे बामसेफचे गवई सर , सरदार साहेब आदींची प्रमुख उपस्थिती होती

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# आकाशवाणीचा आवाज चोरला! वाहिनीवर मराठी कार्यक्रमांची उचलेगिरी, निवेदकांच्या आवाजात फेरफार

**मुंबई :** आकाशवाणी मुंबईच्या ङ्गएफएम रेनबोफ आणि ङ्गएफएम गोल्डफया वाहिन्यांवरील अनेक कार्यक्रम एका यूट्युब वाहिनीवर निवेदकांच्या आवाजात सॉफ्टवेअरद्वारे बदल करत जसेच्या तसे अपलोड करण्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकाराबाबत आकाशवाणी मुंबईच्या अनेक निवेदकांनी नाराजी व्यक्त करत ही बाब केंद्र संचालकांच्या निदर्शनास आणून दिली. या यूट्युब वाहिनीच्या व्हिडीओंखाली केलेल्या टिप्पण्याही हटवल्या जात होत्या. आता या यूट्युब वाहिनीविरोधात आणि तिच्या चालकांच्या विरोधात कॉपीराइट कायद्याखाली कारवाई करण्याची तयारी आकाशवाणीच्या मुंबई केंद्राने केली आहे. आकाशवाणी मुंबईचे एफएम रेनबो आणि ङ्गएफएम गोल्डफ्ने अनेक कार्यक्रम श्रोत्यांच्या खास आवडीचे आहेत. सकाळी पाच वाजल्यापासून सुरू होणाऱ्या अनेक कार्यक्रमांचा स्वत:चा असा श्रोतृवर्ग आहे. या कार्यक्रमांचे निवेदन करणारे सर्वच निवेदक प्रत्येक कार्यक्रमासाठी एखादा विषय निवडतात. त्या विषयासाठी त्या विषयासंबंधी व्यक्तींचा अभ्यास करतात. त्यातून निवेदन लिहून त्यात विविध किस्से, आठवणी यांचा गोफ विणतात. त्यामुळे श्रोत्यांनाही या कार्यक्रमांमधून अनेक अपरिचित पैलू गवसतात. गेल्या काही महिन्यांपासून यूट्युबवरील ङ्गमराठी पडद्यामागील किस्सेफ नावाच्या एका वाहिनीवर आकाशवाणीच्या या दोन वाहिन्यांवरील कार्यक्रमांची संहिता जशीच्या तशी वापरली जात असल्याचे दोन दिवसांपूर्वी काही निवेदकांच्या लक्षात आले. संबंधित यूट्युब वाहिनी हे कार्यक्रम मुद्रित करून त्यातील निवेदकांच्या आवाजात फेरफार करून ते तसेच अपलोड करत असल्याचे लक्षात आल्यावर निवेदकांमध्ये संतापाची लाट पसरली.आम्ही आमच्या कार्यक्रमांसाठी प्रचंड मेहनत घेतो.

अनेकदा तब्येत बरी नसतानाही आवाज कसोशीने सांभाळत पहाटे पाच वाजता कार्यक्रम - करतो. अशा वेळी कोणीतरी आमच्या बौद्धिक संपदेवर असा दरोडा घालावा, हे लाजिरवाणे आणि त्रासदायक आहे, अशी प्रतिक्रिया एका निवेदकाने व्यक्त केली. अनेक निवेदकांनी संबंधित व्हिडीओंखाली टिप्पणी करण्याचा प्रयत्न केला असता, या यूट्युब वाहिनी चालवणाऱ्यांनी त्या डिलीट केल्या. या वाहिनीचालकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता, एक क्रमांक मिळाला. मात्र त्या क्रमांकावर वारंवार फोन करूनही कोणीही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे संबंधितांची प्रतिक्रिया मिळू शकलो नाही.आकाशवाणी बौद्धिक संपदा कायदा, स्वामित्वहक्क कायदा याबाबत प्रचंड सजग आहे. आम्ही इतर कोणाचीही बौद्धिक संपदा परवानगीशिवाय वापरत नाही. त्यामुळे आमची बौद्धिक संपदा कोणी चोरत असेल, तर त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल. सोशल मीडियाच्या युगात यावर नियंत्रण ठेवणे कठीण आहे. पण आम्ही रीतसर कारवाई करणार आहोत,फ असे आकाशवाणी मुंबईचे केंद्राचे संचालक शैलेश माळोदे यांनी सांगितले.

# गुजरात पाकिस्तानचा प्रांत नाही, मुंबई त्या राज्याची देखील राजधानी होती, प्रतापराव जाधव यांचं वक्तव्य...


**धाराशिव :** संयुक्त महाराष्ट्र असताना गुजरात महाराष्ट्र आपण त्यामध्ये होतो. मुंबई गुजरातची देखील राजधानी होती. मुंबईमध्ये देखील मोठ्या प्रमाणात गुजराती राहतात. गुजरात हा काही पाकिस्तानचा प्रांत नाही. आपल्याच शेजारचे राज्य आहे, अशा गोष्टीचे राजकारण करायला नको, असं वक्तव्य केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जय गुजरात वक्तव्याचे समर्थन करताना प्रतापराव जाधव यांनी संबंधित वक्तव्य केलं. सामाजिक कार्यक्रमात आम्हाला बोलावल्यावर आपला स्वाभिमान ठेवत त्यांचाही स्वाभिमान जागृत करण्याचा प्रयत्न आम्ही करतो. त्यामुळे एकनाथ शिंदेंनी केलेलं वक्तव्य चुकीचं नाहीङ्घ, प्रतापराव जाधव म्हणाले. शिवाजी पार्क वरून बाळासाहेब ठाकरे तमाम हिंदू बांधवांनो म्हणायचे, उद्धव ठाकरे ते विसरले. त्यांनी हिंदुत्व का सोडलं? याबाबत कोणी विचारत नाही. दुसऱ्याच्या डोळ्यातलं कुसळ दिसतं पण आपल्या डोळ्यातलं मुसळ दिसत नाही, या म्हणीप्रमाणे त्यांची अवस्था झालीङ्घ, अशी टीकाही



त्यांनी केली. तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

प्रतापराव जाधव यांच्या वक्तव्यावर आमदार आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे. ते कुठल्या पक्षात आहेत? आणि त्यांच्यावर पक्ष कारवाई होणार का? दुसरं म्हणजे त्यांच्या नेत्यांनी जय गुजरात हे पुण्यात म्हटलं आहे. कुठे काय चाललं आहे. आज भाजपने मराठी माणसाची तुलना पाकड्यांबरोबर केली आहे. म्हणजे किती मराठी आणि महाराष्ट्र माणसाबद्दल भाजपच्या मनात द्वेष आहे. ते ज्या पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना पकडू शकले नाहीत त्या पाकड्यांची तुलना तुम्ही मराठी माणसाशी करतात? खरंतर तुम्ही महाराष्ट्राची माफी मागितली पाहिजे. महाराष्ट्राचा खरा शत्रू हा भाजप आहे, असा घणाघात आदित्य ठाकरे यांनी केला.दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या भाषणाच्या शेवटी जय गुजरात म्हटल्याने वाद निर्माण झाला आहे. पण एकनाथ शिंदे यांनीदेखील माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा गुजरातमधील २०१९ चा व्हिडीओ दाखवला आहे. या व्हिडीओत उद्धव ठाकरे जय गुजरात म्हणताना दिसत आहेत. त्यामुळे दोन्ही बाजूने टीका-टीप्पणी सुरु आहे.

# रक्तगट जुळत नसतानाही तरुणाचे यशस्वी किडनी प्रत्यारोपण, पुण्यातील डॉक्टरांची कमाल!




**पुणे :** बांगलादेशातील तरुणाला मूत्रपिंडाचा (किडनी) आजार झाल्याने तो उपचारांसाठी पुण्यात आला. किडनी प्रत्यारोपण एकमेव मार्ग असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या तरुणाच्या आईने किडनी देण्याची तयारी दाखवली. मात्र, रक्तगट जुळत नसल्याने प्रत्यारोपण यशस्वी होणार की नाही, असा प्रश्न उपस्थित झाला. आई आणि मुलाचा रक्तगट भिन्न असतानाही पुण्यातील डॉक्टरांनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी करून या तरुणाला जीवनदान दिले.बांगलादेशमधील ३१ वर्षीय तरुणाला किडनीचा त्रास असल्याने तो पुण्यातील नोबल हॉस्पिटल मध्ये दाखल झाला होता. त्याच्यावर डायलिसिसद्वारे उपचार सुरू होते. तरुणाला आयजीए नेफ्रोपॅथी (बर्जर्स डीसीज) या आजार असल्याचे निदान तपासणीत झाले. आयजीए नेफ्रोपॅथी या दुर्मीळ स्थितीत शरीरातील रोगप्रतिकारशक्ती प्रतिपिंड (अँटीबॉडी) तयार करते. यामुळे टाकाऊ पदार्थ बाहेर टाकण्याच्या मूत्रपिंडाच्या क्षमतेवर परिणाम होतो. कालांतराने मूत्रपिंड निकामी होते. त्यामुळे प्रत्यारोपण हा एकमेव मार्ग उरतो.या रुग्णाच्या कुटुंबात केवळ आई मूत्रपिंड दान करू शकत होती. मात्र, रुग्णाचा रक्तगट बी पॉझिटिव्ह आणि आईचा एबी पॉझिटिव्ह होता. बी पॉझिटिव्हसाठी बी किंवा ओ रक्तगट असलेले दाते असणे गरजेचे होते. रक्तगट जुळत नसताना प्रत्यारोपण केल्यास शरीर नवीन अवयव नाकारण्याची जोखीम असते. त्यामुळे रुग्णाच्या प्रतिपिंडाच्या बाबतीत चाचण्या घेण्यात आल्या. त्यानंतर विशिष्ट प्रकारचे इंजेक्शन देऊन प्रतिपिंड निर्माण करण्याची क्षमता कमी करण्यात आली; तसेच रक्तातील सद्यस्थितीतील प्रतिपिंड शरीराबाहेर काढण्यासाठी प्लाझ्मा फेरेसिस ही प्रक्रिया करण्यात आली. प्रत्यारोपणाच्या पूर्ण प्रक्रियेत शरीर नवीन अवयव नाकारणे, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे ही जोखीम होती. त्यामुळे सर्व प्रकारची काळजी घेण्यात आले, असे नोबल हॉस्पिटलचे प्रत्यारोपण चिकित्सक डॉ. अविनाश इग्राशिअस यांनी सांगितले.डॉ. राकेश शिंदे, डॉ. विक्रांत सातव, डॉ. शशिकांत भनगे, डॉ. शार्दुल दाते, डॉ. संगीता चंद्रशेखर, डॉ. नीलेश वसमतकर, डॉ. बी. डी. बांदे यांनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी केली.

# पुणेकरांची पाण्याची चिंता मिटली! खडकवासला प्रकल्पात ६० टक्क्यांपर्यंत पाणीसाठा, अन्य धरणेही जून महिन्यातच फुल्ल

**पुणे** : पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील चारही धरणांत आजमितीला सुमारे ६० टक्क्यांपर्यंत पाणीसाठा जमा झाला आहे. त्यामुळे पुणे शहराची सहा महिन्यांच्या पाण्याची चिंता मिटली आहे. धरणांमध्ये १७.३७ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा जमा झाला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत १३ ङ्गटीएमसीफ पाणीसाठा अधिक जमा झाल्याची जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यातील ही पहिलीच वेळ असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले. खडकवासला प्रकल्पातील खडकवासला, टेमघर, पानशेत आणि वरसगाव धरणांच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाने हजेरी लावली आहे. गेल्या चोवीस तासांत किरकोळ स्वरूपाचा पाऊस झाला. शुक्रवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत खडकवासला धरणात चार मिलिमीटर, पानशेतमध्ये २९ मिमी, वरसगावमध्ये २७ आणि टेमघरमध्ये ४३ मिमी पाऊस झाला आहे. काही दिवसांपूर्वी धरणासह घाटमाथ्यावर पाऊस झाल्याने धरणातील पाणीसाठा वाढला. त्यामुळे जलसंपदा विभागाने खडकवासला प्रकल्पातून विसर्ग करण्यास सुरुवात केली होती. आता हा विसर्ग कमी करण्यात आला आहे. जून महिन्यापासून झालेल्या पावसामुळे आतापर्यंत ३.७७ टीएमसी पाणी धरणातून सोडले आहे. खडकवासला प्रकल्पात १७.३७ टीएमसी (५९.५८ टक्के) पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी ४.८५ टीएमसी (१६.६२टक्के) पाणीसाठा उपलब्ध होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत १३ टीएमसी पाणी अतिरिक्त जमा झाले आहे.पुणे जिल्ह्यातील कळमोडी आणि नाझरे धरण जून महिन्यातच शंभर टक्के भरली आहेत. जिल्ह्यातील उर्वरित धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही गेल्या वर्षीच्या तुलनेत जून महिन्यात चांगला पाऊस झाल्याने धरणातील पाण्याची पातळी वाढली आहे. गुंजवणी, वीर, कासारसाई, वडिवळे, आंद्रा, चिल्हेवाडी, घोड, येडगाव धरणात ७२ टक्क्यांपेक्षा अधिक साठा जमा झाला आहे. ङ्गटाटांफच्या विविध धरणांत ६३.८६ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. पवनामध्ये ६९ टक्के आणि भामा आसखेडमध्ये ५० टक्के



पाणीसाठा जमा झाला आहे.सोलापूर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी धरणात मे महिन्यापासून सुरू असलेल्या पावसामुळे पाणीसाठा वाढू लागला. सातत्याने होणाऱ्या पावसामुळे खडकवासला प्रकल्पातून विसर्ग करण्यात आला. उजनी धरणातील पाणी पातळी वाढल्याने धरणातून पहिल्यांदाच जूनमध्ये पाणी सोडण्यात आले. उजनीमध्ये आजमितीला ४०.१७ टीएमसी म्हणजेच ७४.९८ टक्के इतका पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी धरणात उणे २१.६७ टीएमसी (- ४०.७५ टक्के) मृत पाणीसाठा शिल्लक होता.

## देवनारची विल्हेवाट कोणाकडे? कचऱ्यावर प्रक्रिया करुन तीन वर्षांत डंपिंगची जागा रिकामी करणार, निविदा प्रक्रिया सुरु

**मुंबई** : राज्य सरकारने देवनार डंपिंग ग्राउंडमधील १२४ एकर जागा धारावी पुनर्विकासासाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी या ग्राउंडमधील कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून तीन वर्षांत रिकामी केली जाणार आहे. या कामासाठी मुंबई महापालिकेने काढलेल्या निविदेला प्रतिसाद मिळाला असून तीन कंपन्यांनी यात रूची दाखवली आहे. यातून एका कंपनीची निवड करून त्या कंपनीला २ हजार ३६८ कोटी रुपयांचे काम दिले जाणार आहे.देवनार डम्पिंग ग्राऊंडमधील २३५ एकरपैकी मुंबई महापालिकेस आवश्यक असलेले क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रापैकी १२४ एकर जागा धारावी पुनर्विकासाला देण्याचा निर्णय पाच ते सहा महिन्यांपूर्वी राज्य सरकारने घेतला. डम्पिंग ग्राऊंडवरील ७५ एकरवर कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प ऑक्टोबर २०२५ मध्ये कार्यान्वित होईल. तर उर्वरित जागा महापालिकेला डम्पिंगसाठीच उपलब्ध होणार आहे. देवनारची जागा ही राज्य सरकारमार्फत मुंबई महापालिकेला ९९ वर्षांच्या भाडेतत्त्वावर देण्यात आली होती. पुनर्विकासाला गती मिळावी यासाठी २४ जानेवारी



२०२५ ला महसूल आणि वन विभागाने मुंबई महापालिका आयुक्तांना पत्र पाठवले होते. यामध्ये, स्वच्छ भारत मिशन नियम २०१६ नुसार डम्पिंग ग्राऊंडमधील कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून जमीन रिकामी करण्याची जबाबदारी महापालिकेची आहे.

तशी विनंती धारावी पुनर्विकास प्रकल्पाने ३ जानेवारी २०२५ ला पत्राद्वारे केली होती.त्यानुसार या डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून राज्य सरकारने ज्या स्थितीत जमीन दिली होती, त्यात स्थितीत जमीन रिकामी करून देण्याचे महसूल आणि वन विभागाने पत्राद्वारे केले होते. त्यानुसार मुंबई महापालिकेने देवनार डंपिंग ग्राउंडमधील कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्याचा निर्णय घेत निविदा काढली होती. १४ मे रोजी निविदा जारी केल्यानंतर त्याला तीनवेळा मुदतवाढही देण्यात आली.

यामध्ये निविदापूर्व झालेल्या बैठकीत २१ बड्या कंपन्यांनीही रुची दाखवली होती. यामधून अखेर तीन कंपन्यांची निवड करण्यात आली असून ८ जुलैला निविदा खुली करून एका कंपनीची निवड केली जाणार आहे. यामध्ये महापालिकेने निश्चित केलेल्या किंमतीपेक्षा कमी बोली लावणाऱ्या कंपनीला हे काम दिले जाणार असल्याची सूत्रांनी सांगितले.

## श्रद्धा कपूरने नकळत दाखवली बॉयफ्रेंडची झलक...

**मुंबई** - श्रद्धा कपूर ही बॉलिवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री आहे. श्रद्धा कपूर तिच्या प्रोफेशनल आयुष्यासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असते. अभिनेत्रीच्या खासगी आयुष्यात काय चाललंय, तिचा बॉयफ्रेंड कोण असेल यामध्ये चाहत्यांना खूप उत्सुकता असते. श्रद्धाचा मोठा चाहतावर्ग आहे. अशातच आता अभिनेत्रीचा एका व्हिडिओ व्हायरल होतोय. या व्हिडिओमधून श्रद्धानं तिच्या कथित बॉयफ्रेंडची झलक दाखवली आहे. श्रद्धा कपूरने इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केलाय. या व्हिडिओमध्ये ती विचित्र डान्स करताना दिसतेय. एका व्हिडिओमध्ये तिनं वेगवेगळ्या ठिकाणचे व्हिडिओ शेअर केले आहेत. हा व्हिडिओ शेअर करत तिनं दिल पे चलाई छुरियाँ गाणं लावलं आहे.

त्याचबरोबर, माझा वेडेपणा कोण रोखू शकतं का? असं कॅप्शन लिहिलं आहे. श्रद्धाचा हा व्हिडिओ चर्चेत आलाय. कारण, श्रद्धा डान्स करतेय त्या व्हिडिओमध्ये तिच्या पाठीमागे एक व्यक्ती बसलेली दिसतेय. ही व्यक्ती म्हणजे प्रसिद्ध निर्माता राहुल मोदी आहे.श्रद्धा कपूर आणि राहुल मोदी रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा आहेत. पण, यावर दोघांनी



अद्याप प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, आता श्रद्धाच्या या व्हिडिओमुळे तिच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आलं आहे. त्यामुळे श्रद्धा तिच्या प्रेमाची कबुली कधी देते, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. श्रद्धाच्या या व्हिडिओवर चाहत्यांनी तिचं कौतुक केलंय.

या व्हिडिओवर नेटकऱ्यांनी, इतकं टॅलेंट कोणामध्ये कसं असू शकतं?, तू शेअर केलेल्या व्हिडिओमुळे माझं सगळं टेन्शन दूर झालं, एका क्लिपमध्ये राहुल मोदी आहे, याकडे कोणी लक्ष दिलं का?, व्हिडिओमध्ये राहुल मोदी दिसत आहे, तुझ्याशी कोणी स्पर्धा करू शकत नाही अशा कमेंट्स केल्या आहेत.दरम्यान, श्रद्धा कपूरच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं तर तिनं स्त्री २, आशिकी २, तू झूठी में मक्कार, बागी, एक व्हिलन, हाफ गर्लफ्रेंड, ओके जानू, छिछोरे, बागी ३, सोहो, भेडिया, हैदर, स्ट्रीट डान्सर, हसीना पारकर यांसारख्या सिनेमांमध्ये काम केलं आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# एकत्र आले, पण एकत्र राहणार? उद्धव-राज मनोमिलनात ३ गेमचेंजिंग मुद्दे, ठाकरे बंधूंच्या युतीवर प्रश्नचिन्हच...

**मुंबई :** हिंदीसक्तीच्या मुद्द्यावर आक्रमक होऊन मराठीशक्तीचे दर्शन घडवत शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे अगदी सहजपणे व्यासपीठावर एकत्र आले असले तरी मुंबई महापालिकेसह आगामी निवडणुकीत ते एकत्र येतील का, यावर अद्याप प्रश्नचिन्ह आहे. प्रामुख्याने मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक यांसारख्या शहरी भागांत या ठाकरे बंधूंचे सर्वस्व असल्याने आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवताना जागावाटपात त्यांची कसोटी लागणार आहे, शिवाय भाजपच्या आमिषाला बळी न पडता एकी टिकवून राजकीय यश मिळवण्याचे आव्हान ठाकरे बंधूंपुढे आहे. हिंदीसक्तीफ्ला विरोध करण्यासाठी मनसे आणि शिवसेना (उबाठा) या पक्षांनी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेत ५ जुलैला मोर्चा आयोजित केला होता. या नियोजित मोर्चावरून राजकीय वातावरण तापले



आणि विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला २९ जूनला ङ्गहिंदीसक्तीफ्बाबतचे दोन्ही शासननिर्णय रद्द करण्याची घोषणा राज्य सरकारने केली. त्यामुळे पाच जुलैला मोर्चाऐवजी विजयी मेळावा घेऊन मराठीशक्ती दाखवण्याचा निर्णय ठाकरे बंधूंनी घेतला. मेळाव्यात ठाकरे बंधूंनी गळाभेट घेतली. ङ्गएकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी,फ असे सांगत उद्धव ठाकरे यांनी मुंबई महापालिकेसह महाराष्ट्रभर मनसेशी युती करण्याचे स्पष्ट संकेत दिले. मात्र, निवडणुकांच्या मैदानात ठाकरे बंधू एकत्र येणार किंवा कसे, याबाबत अद्याप काहीच निश्चित नाही.शिवसेना उबाठा-मनसे युती झाल्यास कोणी कुठे दावा करायचा, हा कळीचा मुद्दा असेल.

मुळात राज्यातील ग्रामीण भागापेक्षा शहरांत शिवसेनेचे वर्चस्व राहिले आहे. शिवसेनेतील फुटीनंतर कोकणात ङ्गउबाठाफ्ला घरघर लागली. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आल्यानंतर ङ्गउबाठाफ्मधून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे नेते, कार्यकर्त्यांचा ओघ वाढला. दुसरीकडे मनसेचा प्रभाव प्रामुख्याने मुंबई, कल्याण-डोंबिवली, नाशिक, पुणे याच शहरी भागांवर राहिला आहे. त्यामुळे युती करून एखाद्या निवडणुकीला सामोरे जायचे झाल्यास कोणी कोणत्या जागा लढवायच्या, हा जटिल प्रश्न सोडवण्यासाठी ठाकरे बंधूंना तारेवरची कसरत करावी लागेल. जागावाटपात कोण माघार घेणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.जागावाटपाचे गणित चुकले आणि राजकीय अपयश आले तर आधीच कमकुवत असलेल्या या पक्षांवर तो मोठा आघात ठरेल. समर्थकांना विविध शहरांमध्ये पदे देणे, उमेदवारी देणे यावरूनच राज आणि उद्धव यांच्यात फुटीचे बीज रोवले गेल्याचा इतिहास आहे, याकडे दोन्ही पक्षांतील नेत्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर लक्ष वेधले. ठाकरे बंधू एकत्र आल्याने काँग्रेस पक्ष संभ्रमात आहे. महापालिका निवडणुकीत त्यांच्यात युती झाल्यास काय करायचे, याबाबत काँग्रेसचा अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळेच ठाकरेंच्या विजयी मेळाव्याला उपस्थित राहू नये, असे संकेत काँग्रेस पक्षाचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिले होते. काँग्रेसच्या परंपरागत मुस्लिम जनाधारातही आता शिवसेना (उबाठा) पक्षाने मोठ्या प्रमाणावर घुसखोरी केली आहे. त्यात उबाठा-मनसे युती झाल्यास मुंबई महापालिकेत काँग्रेस शेवटच्या क्रमांकावर फेकली जाण्याची शक्यता आहे. यामुळे काँग्रेस काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रस्ते कामात फसवणूक; अनेक मस्टरवर महिलांच्या जागी पुरुषांचे फोटो, रोजगार हमी योजनेच्या कामात गंभीर प्रकार उघड...

**फुलंब्री :** पंचायत समितीच्या रोजगार हमी योजनेतील (रोहयो) मातोश्री पाणंद रस्ते कामात अनियमितता झाल्याची शक्यता असून, एकच फोटो वारंवार वेगळ्या मस्टरला लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.अनेक हजेरी रजिस्टरमध्ये (मस्टर) नावे महिलांची अन फोटो पुरुषांचे असा प्रकारही दिसला आहे. यावरून या कामांमध्ये अनियमितता झाल्याचा संशय आहे. पंचायत समिती मार्फत राबवल्या जाणाऱ्या रोजगार हमी योजनेंतर्गत पाणंद रस्त्याच्या कामावर हे प्रकार झाल्याचे सूत्रांनी सांगितले. अनेक कामांवर महिला मजूर दाखवण्यात आले; प्रत्यक्षात मात्र फोटो पुरुषांचे लावण्यात आले. विशेष म्हणजे, या कामांची बिले उचलल्याचेही समोर आले आहे.तालुक्यात मातोश्री पाणंद रस्त्याची ११९ कामे सुरू आहेत. यात सर्वाधिक कामे धामणगाव येथे २३, पेंडगाव ७, खामगाव ७ व इतर गावांत दोन चार आदी कामांचा समावेश आहे. नियमानुसार या कामावर असलेल्या मजुरांची छायाचित्रे काढून दररोज ऑनलाइन अपलोड करणे आवश्यक आहे. मात्र, काम पूर्ण होईपर्यंत फक्त एका ग्रुपफोटोचा वापर



करून बिले काढण्यात आल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षात मजुरांची नावे मात्र वेगळी आहेत व फोटो वेगळा आहे, असे पंचायत समितीतील सूत्रांनी सांगितले. हा प्रकार नेमका कुणी व कुणाच्या साह्याने केला याबाबत चर्चा सुरू झाली आहे.तालुक्यातील एका गावात चक्क विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन मजूर म्हणून दाखवण्यात आले. एका ठिकाणी गावच्या पोलिस पाटलाची पत्नीदेखील मजूर म्हणून दाखवल्याचा प्रकार दिसला आहे. धामणगाव येथे २४ मस्टरसाठी फक्त दोन वेगवेगळे फोटो लावले आहेत. महालकिन्होळा येथे सहा मस्टरसाठी, खामगाव येथे नऊ मस्टरसाठी, वानेगाव सहा मस्टर, सताळपिंप्री येथे नऊ मस्टरसाठी एकच फोटो वापरण्यात आल्याचे समोर आले आहे. याबाबत जिल्हा परिषद रोहयो विभागाच्या उपमुख्यकार्यकारी अधिकारी अनुपमा नंदनवनकर यांच्याशी संपर्क साधला असता, संपर्क होऊ शकला नाहीरस्ते कामाच्या मस्टरमध्ये फोटो वापरून जी बिले उचलण्यात आली, त्या कामावर महिला मजूर होत्या; मात्र पुरुषांचे फोटो वापरण्यात आले. पुरुष मजुराच्या जागेवर महिलांचा ग्रुप फोटो अपलोड करण्यात आल्याचे समोर आले आहे. पंचायत समिती अधिकाऱ्यांनी याकडे वेळीच लक्ष का दिले नाही, असा सवाल आता उपस्थित होत आहे. कामे सुरू असताना अधिकाऱ्यांनी भेटी देणे अपेक्षित आहे. त्यांनी भेटी दिल्या की नाही याबाबतही शंका उपस्थित होत आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पत्नीला कलाकेंद्रात नाचायला पाठवलं; सावत्र दिराने भावजयीला संपविलं, सोलापूर हादरलं...

**सोलापूरः** पंढरपूर तालुक्यातील करकंब गावात हादरवून टाकणारी घटना घडली आहे. पत्नीला कलाकेंद्रावर नाचण्यासाठी पाठविल्याचा गैरसमज करून घेत सावत्र दीर, सावत्र सासू आणि सासरा यांनी कुऱ्हाडीने वार करून सावत्र भावजयीचा खून केला आहे. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. करकंब पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत सावत्र दिराला ताब्यात घेतले आहे. हेमा आकाश काळे (वय ३५) असं खून झालेल्या महिलेचे नाव आहे. ४ जुलै रोजी सायंकाळी ४:३० वाजेच्या दरम्यान करकंब येथे टेंभी रोडजवळ (ता. पंढरपूर) ही घटना घडली. पोलिसांनी सावत्र दीर मुकुंदराजा काळे यास ताब्यात घेतले आहे.




हेमा काळेचा पती आकाश बिंदल काळे (ता. पंढरपूर) कामानिमित्त पुणे जिल्ह्यातील भिगवण येथे साडूकडे कामाला होता. आकाशची पत्नी हेमा ही करकंब येथे मुलगा प्रथमेश, व्योमेश , हिमेश, प्रेम, रॉकी व मुलगी आरिना एकत्र राहत होते. आकाश हा साडू सुमित काळे (रा. भिगवण) यांच्याकडे मासे पकडण्याचे काम करतो. करकंब येथे आकाश आणि हेमाच्या घराजवळ वडील बिंदूल काळे, सावत्र आई शालीक, सावत्र भाऊ मुकुंदराजा व पत्नी सोनी हे मुलांसह राहतात.मुकुंदराजा याची पत्नी मागील एक महिन्यापासून जामखेड येथे कलाकेंद्रावर नाचण्याकरिता जात आहे. तिला मयत हेमा हिने शिकवून पाठविल्याचा संशय मुकुंदराजाच्या मनात होता. सावत्र दीर मुकुंदराजा आणि सावत्र सासू, सासरा हे सारेजण आकाश आणि त्याची पत्नी हेमावर चिडून होतेहेमाने ही बाब पती आकाशला सांगितली होती.

सर्वजण माझ्यावर चिडून आहेत. त्यावेळी आकाशने पत्नीला तू लक्ष देऊ नकोस, मी पाणी घेऊन येतो, म्हणाला. त्यानंतर ५ वाजण्याच्या सुमारास आकाश हा पाणी घेऊन येत असताना बिंदूल, शालिका आणि मुकुंदराजा हे मारायला येत असल्याचे दिसले. त्यावेळी आकाशचा मुलगा प्रथमेश भांडण सोडविण्यासाठी गेले. त्यावेळी मुकुंदराजा हातात कुऱ्हाड घेऊन हेमावर धावला. तुझ्यामुळेच माझी बायको कलाकेंद्रावर जायला लागली, तुला मारून टाकतो म्हणत तिच्या मानेवर कुऱ्हाडीने वार केले, तर बिंदूल व शालिका काळे यांनी हेमाला धरले.पतीच्या डोळ्यादेखत पत्नी हेमाला मारहाण होत आहे, यामुळे आकाशने करकंब पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. हेमा जखमी अवस्थेत निपचित पडली होती. पोलिसांनी ताबडतोब हेमाला उपचारासाठी रुग्णालयात हलविले; परंतु उपचारापूर्वीच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. मुख्य आरोपी मुकुंदराजा काळे याला पोलिसांनी अटक केली आहे. पुढील तपास सपोनि सागर कुंजीर हे आहेत.

## भयंकर! बापलेकांनी केला दोन तरुणीचा विनयभंग; बीडमधील खळबळजनक घटना, पोलिसात तक्रार दाखल...

**बीड :** केज तालुक्यातील एका गावात दोघां बापलेकांनी दोन वेगवेगळ्या तरुणीचा विनयभंग केला असून बापाने मतिमंद तरुणीचा घरात शिरून विनयभंग केला तर लेकाने गावातीलच एका शाळकरी मुलीचा पाठलाग करत विनयभंग केल्याची घटना घडली आहे. दरम्यान या दोन्ही वेगवेगळ्या विनय भंगाच्या घटनेत बापलेका विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मात्र दोघे बाप लेक फरार झाले आहेत.एका अपंग व मतिमंद तरुणीच्या घरात घुसून विनयभंग केल्याची घटना केज तालुक्यातील एका गावात घडली.केज तालुक्यातील एका गावातील ३० वर्षीय अपंग व मतिमंद तरुणी ही ४ जुलै रोजी दुपारी तीन वाजता तिच्या राहत्या घरी एकटीच असल्याची संधी साधून बाळू जालिंदर कांबळे रा.लव्हुरी याने तिच्या घरात घुसून विनयभंग केला. दरम्यान सदर तरुणीने आरडा ओरडा केल्यामुळे पीडित तरुणीच्या चुलतीने तात्काळ धाव घेतली. त्यावेळी सदर आरोपी बाळु जालिंदर कांबळे हा घरातून पळून गेला. दरम्यान पीडितेच्या चुलतीने दिलेल्या तक्रारीवरून बाळू जालिंदर कांबळे याच्याविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. दुसऱ्या घटनेत एका अल्पवयीन शाळकरी मुलीचा पाठलाग करीत आत्महत्या करण्याची व तूझ्या आईवडिलांना जीवे मारून टाकण्याची धमकी देऊन लेकाने एका शाळकरी मुलीचा विनयभंग केला. सदर तरुणाविरुद्ध केज ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या दोन्ही घटनेत दोघे बापलेकानी दोन वेगवेगळ्या तरुणीचा विनयभंग केला आहे.या दोघा बापलेका विरुद्ध दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत. दुसऱ्या घटनेत आरोपी निखील बाळासाहेब कांबळे हा एका शाळकरी मुलीचा शाळेत जाता-येता पाठलाग करीत तू माझ्याशी बोलली नाहीस,



तर मी आत्महत्या करीन नाही तर तुझ्या आईवडिलांना जीवे मारून टाकीन अशी धमकी देत अल्पवयीन शाळकरी मुलीचा विनयभंग केला.केज तालुक्यातील एका गावातील इयत्ता ९ वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीचा मागील १५ दिवसापासून निखील बाळासाहेब कांबळे हा तरुण दुचाकीवरून तिच्या मागे - मागे पाठलाग करीत होता. ४ जुलै रोजी सदर मुलगी शाळेतून घरी येत असताना आरोपी निखिल बाळासाहेब कांबळे याने पाठलाग करीत तिला तू माझ्यासोबत का बोलत नाहीस, तू माझ्या सोबत बोलली नाहीस, तर मी आत्महत्या करील. तुझ्या आई वडीलांना मारील अशी धमकी देऊन निघून गेला.हा सर्व प्रकार मुलीने तिच्या आईला सांगितल्यानंतर मुलीच्या आईने मुलाच्या आईला तुझा मुलगा माझ्या मुलीला कशामुळे त्रास देतो, अशी विचारणा केली असता आरोपी निखील कांबळे व त्याची बहिण पुनम कांबळे या दोघांनी उलट मुलीच्या आईला शिवीगाळ करीत चापटने मारहाण केली.अशी तक्रार मुलीच्या आईने दिल्यावरून निखिल बाळासाहेब कांबळे व त्याची बहीण पूनम कांबळे या दोघा बहिणभावा विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पिंक पथकाचे फौजदार प्रकाश शेळके हे करीत आहेत.तर अपंग व मतिमंद तरुणीचा घरात शिरून विनयभंग प्रकारणाचा तपास सहाय्यक फौजदार अशोक सोनवणे हे करीत आहेत.

## भारताचा शुभआरंभ, इंग्लंडचे गर्वहरण करत दणदणीत विजय, ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकला...



**बर्मिंगहमः** इंग्लंडचे गर्वहरण करत भारतीय संघाने ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकवला. दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने देदिप्यमान कामगिरीचा नजराणा पेश केला. शुभमन गिलने द्विशतकासह भारताच्या विजयचा पाया रचला होता. भारताच्या गोलंदाजांनी त्यावर कळस चढवला आणि त्यामुळे भारताला हा दुसरा सामना जिंकता आला. भारताने या सामन्यात ३३७ धावा राखत मोठा विजय मिळवला. या सामन्यातील विजयासह भारताने मालिकेत १-१ अशी बरोबरी केली आहे. पहिला कसोटी सामना भारताला गमवावा लागला होता. त्यानंतर या सामन्यातील विजयासह युवा भारताने या मालिकेत आता १-१ अशी बरोबरी केली आहे.शुभमन गिलने पहिल्या डावात द्विशतकत झळकावले, तर दुसऱ्या डावात त्याने शतकही पूर्ण केले. त्यामुळे गिलच्या या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर भारताने इंग्लंडपुढे विजयासाठी ६०८ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने इंग्लंडची चौथ्या दिवशी ३ बाद ७८ अशी अवस्था केली होती. त्यानंतर पाचव्या दिवशी भारताला विजयासाठी सात विकेट्सची गरज होती. पण पाचव्या दिवसाच्या सुरुवातीला जोरदार पाऊस आला आणि सामना वेळेत सुरु झाला नाही. पण पावसानंतर भारतीय गोलंदाजांच्या अचूक गोलंदाजीने इंग्लंडच्या फलंदाजांच्या नाकी नऊ आणले होते. खासकरुन आकाश दीप त्यावेळी आग ओकत होता. आकाश दीपने एकामागून एक दोन धक्के इंग्लंडला दिले.आकाश दीपने प्रथम ऑली पोपला २४ धावांवर असताना क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर आकाश दीपने अप्रतिम चेंडू टाकत भारताच्या विजयाच्या मार्गात अडसर ठरत असलेल्या हॅरी ब्रुक्सला बाद केलं. यावेळी आकाशने एवढा वेगवान चेंडू टाकला की, आपण बाद झालो, हे हॅरीला समजलंच नाही. त्यानंतर बेन स्टोक्सचा अडसर वॉशिंग्टन सुंदरने दूर केला. पण यावेळी जेमी स्मिथ भारताच्या विजयाच्या मार्गातील मोठा काटा होता. पण आकाश दीपने त्याला ८८ धावांवर बाद केले आणि तिथेच भारतीय संघाचा विजय निश्चित झाला.भारताने या सामन्यात अचूक गोलंदाजी केली आणि त्याचा फायदा त्यांना झाल्याचे पाहायला मिळाले.

# बुलढाण्यात सर्वांत भारी शिवसाईची वारी वाजत गाजत निघाली विठुरायाच्या दारी...








**जनसंचलन/बुलढाणा**

शिवसाई मधे अवतरली पंढरीची वारी. विठ्ठल विठ्ठल विठ्ठला हरी ओम विठ्ठला, रामकृष्ण हरी, विठुरायाच्या नामघोषात अवघा महाराष्ट्राच नव्हे तर अवघा आसमंत दणाणून निघतो. शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कुल चे विद्यार्थी आज सकाळीच विठ्ठल-रुक्माई व वारक-याच्या वेशभूषेत तयार होऊन शाळेमध्ये आले उपस्थित होते. शिवसाई ज्ञानपीठ चा परिसर टाळ व मृदुंगाच्या निनादाने मंत्रमुग्ध झाला होता दरवर्षी प्रमाणे शिवसाई चे विद्यार्थी वारकरी व विठ्ठल-रुखमाईच्या, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव , संत एकनाथ महाराज ईत्यादी संतांच्या वेशभूषेत पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते या वर्षी देखील पालकांच्या सहकार्याने वर्ग नर्सरी, ज्युनिअर व सीनिअर केजी चे चिमुकले विविध वेशभूषेत पादचाऱ्यांना आकर्षित करत होते, तसेच वारीमध्ये शिस्तीचे दर्शन घडत होते करीता भूषण कानडजे, ऋषिकेश टेकाळे, धनंजय उबरहंडे, श्रीराज पोफळे, विवेक भुसारी यांनी शिस्तीची कमान क्रिडा शिक्षक सागर उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वर्ग १ ली ते १० वी चे जवळपास एक हजार तीनशे विद्यार्थी पायी दिंडी वारी मध्ये विविध देखावे सादर करीत विठुरायाचा नामाचा जयघोष करीत टाळ मृदुंग रस्त्याने पावली, फुगडी खेळत उपस्थितांची वाहवा मिळवत होते वर्ग ४ थी व ६ वी च्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले करीता अर्चना हिवाळे व सिमा बोदडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. विठ्ठलाच्या वेशभूषेत ईश्वरी डुकरे, पार्थ मोहरकर, शौर्या हिवाळे. पालखीची धुरा ओमकार वाघ , जीवक धुरंधर यांनी सांभाळली. पालखी मधे विठ्ठल रुखमाई मोठया दिमाखात शोभून दिसत होती. सकाळीच वरुण राजा प्रसन्न झाले होते. परंतू विद्यार्थ्यांचा उत्साह व पालकांचे सहकार्य व शिक्षकांची खंबिर साथ असल्यामुळे पायी दिंडीचे यशस्वी आयोजन झाले. दिंडी सोहळा पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा महिला व पुरुषांची संख्या वाखण्याजोगी होती महिलांनी पालखीचे स्वागत केले व शुभेच्छा देत विठूरायाच्या नावाचा जयघोष केला. शिवसाईच्या शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थिताना प्रसादाचे वाटप करण्यात आले, पायी दिंडी वारी तुळशी नगर परिसर परिसर ते एच.डी.एफ.सी. चौक, ते चिंचोले चौक नंतर राम नगर व शिवसाई ज्ञानपीठ मधे समारोप करण्यात आला. समारोप प्रसंगी शिवसाई परिवाराचे सर्वेसर्वा डी,एस लहाने तथा सौ. मीनाताई लहाने संचालिका शिवसाई नागरी सहकारी पतसंस्था आवर्जून उपस्थित होत्या एकादशीचे महत्व सांगत आपण सर्वांनी भक्त पुंडलिका प्रमाणे आपल्या आई वडिलांची सेवा करा असे सांगितले तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबत संस्कार ज्ञान देखील महत्वाचे आहे असे प्रतिपादन केले. प्राचार्य प्रमोद मोहरकर यांनी विद्यार्थ्यांना एकतेचा संदेश देत सांघिक कार्याचे महत्व पटवून दिले कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक डी. बी. मोहरकर, पुष्पा गायकवाड, अपेक्षा मुळे, भागवत उबरहंडे, अश्विनी बंगाळे, तथा शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कूल चे महिला शिक्षिका व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाची कामगिरी बजावली व नंतर विद्यार्थ्यांना लाडु व प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सुनगाव येथे गुटख्याची खुलेआम विक्री! कारवाई करणार कोण?

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

सुनगाव परिसरातील किराणा व पान टपऱ्या तसेच इतर चिल्लर दुकानांमध्येही गुटख्याची खुलेआम अवैध विक्री सुरू असून याकडे स्थानिक पोलीस वअन्न व औषध प्रशासनाचे साफ दुर्लक्ष होत असून परिसरात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्रीतून उलाढाल होत असून मोटर सायकलच्या डिक्कीतून व मोठ्या पिशवीतून गावात काही ठिकाणी गुटखा आणल्या जात असल्याचे दिसून येत आहे मात्र पोलीस व अन्न व औषधप्रशासनाची कारवाई शून्य आहे या अवैध गुटखा विक्रीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेत कडक पावले उचलण्याची मागणी सुज्ञ नागरिकांकडून बोलताना व्यक्त केली जात आहे महाराष्ट्र शासनाने काही वर्षापासून गुटखाबंदी केली असून ही गुटखाबंदी केवळ कागदावरच दिसत आहे ,प्रत्यक्षात गुटखाबंदी नसून चोरीच्या मार्गाने गुटखा सर्रास विकल्या जात आहे गुटखा तस्करी करणारे रॅकेट जळगाव जामोद




पोलिसांच्या रडारवर असताना या ठिकाणी गुटखा येतो कुठून असा प्रश्न उपस्थित होत आहे मध्यप्रदेश मार्गे अवैध गुटखा येत असल्याची माहिती आहे रात्रीच्या वेळी या गुटख्याची विल्हेवाट लावली जात असून काही दुकानदार खुलेआम गुटखा विक्री करीत आहेत सुंदर परिसरात अनेक ठिकाणी गुटखा माफिया खुलेआम गुटखा पोहोचून गुटखा विकत आहेत मात्र गुटखा विक्री बंद असतांना दुकानदार गुटखा विकत असल्याने नव युवक लहान मुले व्यसनांच्या आहारी जात आहेत बरेचशे शाळकरी विद्यार्थी गुटखा व्यसानच्या आहारी गेले आहेत त्यामुळे गुटखा विक्री करणाऱ्या दुकानांवर काय कारवाई केली जाते हे पाहणे गरजेचे झाले आहे .अवैध गुटखा विक्री हे पोलिसांसमोर व अन्न औषध प्रशासना पुढे एक तगडे आवाहन निर्माण झाले आहे आता तरी याकडे अन्न औषध प्रशासनाने व पोलीस विभागाने त्वरित लक्ष देऊन सर्रास होत असलेल्या या अवैध गुटखा विक्रीला आळा घालण्याची मागणी सुज्ञ नागरिकांकडून होत आहे. बुलढाणा जिल्ह्याला नवीनच लाभलेले आयपीएस अधिकारी पोलीस अधीक्षक तांबे याकडे लक्ष देतील काय असा प्रश्न जनतेमध्ये निर्माण झाला आहे

# मिर्झा नगरात बिबट्याचा धुमाकूळशिकार करताना कॅमेऱ्यात कैद !



**जनसंचलन/बुलढाणा**

शहरालगतच्या मिर्झा नगरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढला असून, आता वस्तीत शिरलेल्या बिबट्याने डुकराच्या पिलाची शिकार केली. ही थरारक घटना सालेहा अपार्टमेंटजवळील सीसी कॅमेऱ्यात शनिवारी रात्री कैद झाली असून, व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिर्झा नगर परिसर अजिंठा पर्वतरांगेला लागून असून, निसर्ग सान्निध्यात असल्यामुळे वन्य प्राण्यांचा वावर येथे काही प्रमाणात असतो; मात्र अलीकडील घटनांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड दहशत पसरली आहे. मागील आठवड्यात म्हाडा कॉलनीत एकाच वेळी चार बिबटे दिसून आले होते. त्यानंतर २७ जून रोजी दोन बिबटे मिर्झा नगरात घुसल्याचे दिसून आले. दोन दिवसांपूर्वी रात्री १० वाजण्याच्या सुमारास शेख बिबट्याने केलेली शिकार. नजीर यांच्या घराच्या मागे बिबट्याचे दर्शन झाले होते आणि आता डुकराच्या पिलावर झालेल्या हल्ल्याने बिबट्याचा वावर पुन्हा अधोरेखित झाला आहे. वन विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, बिबट्याचा तत्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी मिर्झानगर परिसरातील नागरिकांनी केली आहे. शहरात बिबट्यांचा संचार वाढल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ज्यांची शिवसेना नकली,गळ्यात घातलेला वाघाचा दात नकली-जयश्रीताई शेळके

**जनसंचलन/बुलढाणा**

मुंबईत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र आल्यानंतर त्यांच्यावर टीका करताना शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांची जीभ घसरली. मराठी भाषेच्या मुद्द्यावर बोलताना आणि ठाकरेंवर टीका करताना त्यांनी छत्रपती संभाजीराजे आणि शिवरायांबद्दलही अपशब्द वापरले. या पार्श्वभूमीवर उबाठा शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी या आमदार महोदयांनी जाहीरपणे माफी मागावी अशी मागणी करीत त्यांच्यावर टीका केली आहे. दैनिक जनसंचलन यासंदर्भात जयश्री शेळके यांची प्रतिक्रिया जाणून घेतली आहे.त्यांची प्रतिक्रिया त्यांच्याच शब्दात देत आहोत..त्या म्हणाल्या की,दिल्लीची जीहुजुरी करण्यात किती लाचारी पत्करायची याला काही मर्यादा? परंतु या सर्व मर्यादेला पार धुळीला मिळविण्याचे काम काही एसएनसी गटाचे प्रमुख व आमदार करीत आहे.काल एका आमदार यांनी जे काही वक्तव्य केले त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब, महाराणी येसूबाई, महाराणी ताराराणी यांचा अवमान करण्याचे काम या आमदार महोदय यांनी केले आहे.त्यांनी जाहीरपणे माफी मागितली पाहिजेआणि



ज्यांची शिवसेना नकली,गळ्यात घातलेला वाघाचा दात नकली अशा अशा नकली लोकांकडून खऱ्या महाराष्ट्र प्रेमाची व खऱ्या मराठी प्रेमाची आपण अपेक्षा करू शकत नाही, अशा शब्दात जयश्री शेळके यांनी बोचरी टीका केली.

# समाज विघातक व्हायरस जेरबंद!

**जनसंचलन/बुलढाणा**

पोलीस स्टेशन अंतर्गत चोरीच्या गुन्ह्यातील २ अट्टल गुन्हेगारापैकी समाजविघातक कृत्य करणारा अंकूश उर्फ व्हायरस गणेश देशमुख (वय २९ वर्ष) रा.घरकुल रावण टेकडी खामगाव जि. बुलढाणा याला एलसीबीच्या पथकाने जेरबंद बंद केले आहे तर त्याचा एक साथीदार सध्या फरार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. जलंब पोलीस स्टेशन हद्दीत ५ जुलै रोजी चोरी च्या गुन्ह्याचा तपास करीत असतांना, सदर व्हायरस पोलिसांच्या हाती लागला. मोटरसायकल चोरी,मोबाईल चोरी व वयोवृद्ध महिलेला पोलीस असल्याची बतावणी करून तिच्या जवळील दागिने, मोबाईल व नगदी पैशाची चोरीचे करणारे एकूण २ आरोपी या गुन्ह्यात निष्पन्न झाले आहे. व्हायरस उर्फ गणेश देशमुख या आरोपीला ताब्यात घेऊन ५ गुन्ह्यांची उकल करण्यात आली. आरोपीकडून १,३७,९०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, एक बजाज कंपनीची पल्सर दोन मोबाईल असा एकूण २,३२,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीची पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वातील एपीआय यशोदा कणसे, एचसी एजाज खान, एनपीसी अनंता फरताळे,पीसी अजीस परसूवाले, मंगेश सनगाळे, निवृत्ती पुंड, राजू आडवे, कैलास ठोंबरे यांनी केली.

# कार्यकर्त्यांनो सज्ज व्हा झेंडा भाजपाचाच मा.आ.विजयराज शिंदे




**जनसंचलन/बुलढाणा**

भाजपा जिल्हाध्यक्ष पदाची गळ्यात माळ पडल्यापासून नव्हे तर आधीपासूनच पायाला भिंगरी लावून कार्यकर्त्यांची फळी निर्माण करणाऱ्या माजी आमदार विजयराज शिंदे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वाधिक भाजपाचे नगराध्यक्ष व नगरसेवक निवडून येतील असा दावा केला आहे.प्रामुख्याने बुलढाणा नगरपालिकेवर भाजपाचा झेंडा फडकविण्यासाठी सज्ज व्हा! असे त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे. जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा जिल्हा संपर्क कार्यालय शिवालय येथे बुलढाणा शहर भाजपच्या प्रमुख पदाधिकारी यांची छोटेखानी बैठक ५ जुलै रोजी संपन्न झाली. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातलेल्या आहेत ह्या निवडणूका कार्यकर्त्यांना व पक्षाला बळकटी देणाऱ्या निवडणुका आहेत. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सबका साथ सबका विकास यामुळे जनसामान्यांत भाजपा पक्षाने आपली प्रतिमा उंचावली आहे. विकासाची ही गती अधिक तिव्र करण्यासाठी बुलढाणा नगर पालिकेत जास्तीत जास्त नगरसेवक व नगराध्यक्ष निवडून आणुन बुलढाणा नगर पालिकेवर भाजपचा झेंडा ताकदीने फडकविण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन माजी आ. विजयराज शिंदे यांनी उपस्थितांना केले. यावेळी शहराध्यक्ष मंदार बाहेकर व शहर भाजपचे आजी माजी नगरसेवक ,पदाधिकारी , कार्यकर्ते उपस्थित होते.

# एलसीबीच्या कारवाईचा बडगा!

## दरोड्यासह ८ बॅग लिफ्टींगच्या गुन्ह्यांची यशस्वी उकल!

### १६ आरोपी ताब्यात,१२ लाख १९ हजारांचा मुद्देमाल जप्त!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे सरसावले असून,त्यांच्या आदेशाने एलसीबी चे पोलिस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांच्या नेतृत्वात पथकाने दरोडा, बॅग लिप्टींग ८, दारूबंदी २ व एका जुगार प्रकरणी तब्बल १२,१९,१५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १६ आरोपींवर कारवाई केली आहे. ही कारवाई ४ जुले रोजी करण्यात आली. बुलढाणा एलसीबीच्या पथकाने जिल्ह्यातील विविध ठिकाणी धडाकेबाज कारवाई केली आहे. मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत दरोडा प्रकरणी अयान अलियान खान रा.बाळापुर जि. अकोला याला ताब्यात घेण्यात आले. तसेच देऊळगाव राजा येथील बॅग लिफ्टिंग प्रकरणात गुन्ह्याची यशस्वी उकल करण्यात आली. यामध्ये ४ आरोपी निष्पन्न झाले.



सुनील काळू चव्हाण,प्रीतम दशरथ चव्हाण, साईनाथ दशरथ चव्हाण, निलेश सुनील चव्हाण सर्व रा. वाटूर फाटा,परतूर जि. जालना अशी आरोपींची नावे आहेत. त्यांनी बॅग लिफ्टिंग च्या ८ गुन्ह्यांची कबुली दिली.देऊळगाव राजा १,मेहकर २,साखरखेर्डा १ व लोणार येथे २ गुन्हे केल्याचे तपासात उघड झाले आहे. तसेच अमडापूर पोलीस स्टेशन हद्दीत देशी विदेशी दारूबंदीच्या कारवाईत आरोपी देवानंद जाधव रा सारशिव याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या कडून ५,०४,४१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बुलढाणा शहर पोलीस स्टेशन हद्दीत सोपान शेषराव धोरण रा. मोताळा या आरोपीकडून बोलेरो वाहनासह अवैध दारू असा एकूण ४,५७१२०रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.या कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८